सत्र खटला क्र. १२/२०२२
सरकार -वि- मोहम्मद शकिल
निशाणी क्रमांक-४९

**सरकारतर्फे साक्षीदार क्र.०१ याची जबानी**

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की

**माझे नांव - साहेबराव पंढरी कुशोड,**
**वय - ३५ वर्ष, व्यवसाय - नोकरी,**
**राहणार - जळगांव जामोद जि. बुलढाणा**

**अभियोग पक्षातर्फे सरतपास विधिज्ञ श्री. व्ही. एम. बापट**

०१. दिनांक १४/१०/२०१७ रोजी मी वनपरिक्षेत्र कार्यालय मोताळा येथे वनरक्षक म्हणून कार्यरत होतो. त्यामधे माझ्याकडे रोहीनखेड बीट होते. त्यामध्ये उबाळखेड, सोनबरड, गुळभेली व रोहीनखेड ही गावे होती. त्यावेळी माझ्यासोबत कर्तव्यावर बुडन खान हैदर हा वनमजूर होता. आम्ही सदर बीटमध्ये पहाटे ६.०० वाजता गस्त ड्युटी करत असतांना गुळभेली जंगलामध्ये आम्हाला एक रेती भरून असलेला ट्रॅक्टर दिसला. आम्ही सदर ट्रॅक्टर चालकाला त्याचे व मालकाचे नांव विचारून रेतीचा परवाना असल्याबाबत विचारणा केली. त्याने त्यावेळी कुठलेही कागदपत्रे दाखविली नाही. सदर ट्रॅक्टर मध्ये रेती होती. सदर बाबीची मी वरिष्ठांना माहीती देवून ट्रॅक्टर वनपरिक्षेत्र कार्यालयाकडे नेत असतांना आम्ही गुळभेली कामखेड मार्गाने मोताळा जात होतो. आम्ही गावाच्या बाहेरील रस्त्याने दत्तभवन परिसरात आलो असता आरोपी क्र.१ तेथे मोटरसायकलवर आला. त्याने मोटरसायकल सरळ माझ्या अंगावर घातली त्यावेळी मी बाजूला झालो व तो

खाली पडला. तो उठून माझ्यासोबत हुज्जत घालू लागला. मी त्याला समजावले. त्यावेळी ट्रॅक्टर चालकाने माझा पाठीमागून येवून गळा पकडला व दोघांनी मला मारहाण केली. त्यांनी ट्रॅक्टर मधील रेती जागेवर ओतुन दिली व ट्रॅक्टर घेवून तेथून निघून गेले. आरोपींनी मारहाण केल्यामुळे माझ्या छातीला मुक्कामार लागला व डोळयाजवळ सुध्दा मार लागला. मी सदर घटनेची माहीती वरिष्ठांना दिली व तेथून पोलिस ठाणे धामणगांव बढे येथे आरोपींविरूध्द फिर्याद दाखविली. फिर्याद मला दाखविली त्यावर माझी सही आहे त्यातील मजकूर बरोबर आहे ती **निशाणी क्र.५०** वर आहे. सदर फिर्यादीवरून पोलिसांनी गुन्हा क्र.०१५७/२०१७ हा नोंदविला सदर घटनेचा प्राथमिक अहवाल मला दाखविला तो **निशाणी क्र.५१** वर आहे त्यावर माझी सही आहे. मी पोलिसांना घटनास्थळ दाखविले होते. पोलिसांनी मला वैद्यकिय तपासणीसाठी पाठविले होते. आरोपी न्यायालयासमक्ष हजर आहे. ते तेच आहे. पोलिसांनी माझा जबाब नोंदविला होता.

**<u>आरोपीतर्फे उलट तपास विधिज्ञ श्री. डी. एम. कोलते</u>**

०२. मी दि. १४/१०/२०१७ रोजी कर्तव्यावर असल्याबाबत कर्तव्यसुची पोलिसांना तपासादरम्यान दिली होती. सदर कर्तव्यसुची अभिलेखावर दाखल केलेली नाही. मी पोलिसांना माझ्या कर्तव्यामध्ये असलेल्या बीट चा नकाशा दिला नाही. तसा बीट चा नकाशा वनविभागाने बनविलेला असतो. वनमजूराची वनविभागाकडे नोंद असते. हे म्हणणे खरे नाही, की वनमजूराला रोजंदारी दररोज दिल्याजाते. घटनेच्या दिवशी बुढन खान हैदर खान हा माझ्यासोबत असल्याचा कागदोपत्री पुरावा वनविभागाकडे आहे. तो माझ्या सोबत असल्याचा कागदोपत्री पुरावा मी पोलिसांना दिला नाही. मी स्वतःच्या वाहनाने गस्त करत होतो. माझ्याकडे स्प्लेंडर प्लस ही दुचाकी होती. आरोपींनी गौनखनिज कुठून आणले

होते याची चौकशी केली होती.  साक्षीदार परत सांगतो की तशी चौकशी मी केली नाही.      गौनखनिजाबाबत महसूल अधिका-यांना फिर्याद देतेवेळी माहीती द्यावी लागते परंतू मी तशी माहीती दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दि. १४/१०/२०१७ रोजी कुठल्याही बीट कर्तव्यावर नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यादिवशी आरोपी आम्हाला गौनखनिज वाहतूक करतांना आढळून आले नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मी महसूल अधिका-यांना सदर वाहतूकीची माहिती दिली नाही.

०३.  आरोपी मला पहिल्यांदा भेटल्यापासून दत्तभवन हे दीढ कि.मी. अंतरावर आहे. पहिल्यांदा मला एकच आरोपी भेटला होता. आरोपी क्र.१ हा नंतर अंदाजे एक तासाने आला.  हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ ने माझ्या अंगावर गाडी घातली हे मी खोटे सांगत आहे.

**<u>उलटतपास मध्यांतरामुळे तहकुब.</u>**

श्रवणोत्तर स्वीकृत,

स्वा/-

मलकापूर.

**(आर. बी. गिरी)**

दिनांक - २४/११/२०२५

अतिरिक्त सत्र न्यायाधीश मलकापूर

**<u>मध्यांतरानंतर आरोपीतर्फे उलट तपास विधिज्ञ श्री. एस. डी. रावत</u>**

०४.  मी पोलिसांसमोरील जबाबामध्ये असे सांगितले होते की, आरोपी क्र. २ ने पाठीमागून येवून माझा गळा पकडला. ते पोलिसांनी माझ्या जबाबात का लिहीले नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. वनपरिक्षेत्रमध्ये सर्वे क्रमांक व गट क्रमांक दिलेले असतात. वनपरिक्षेत्राधिका-याला त्याच्या क्षेत्रामधील सर्वे क्रमांक व गट

क्रमांक माहित असतात. घटना कुठल्या सर्वे क्रमांकामध्ये घडली हे मला आता सांगता येणार नाही. आरोपींनी रेती कुठल्या सर्वे क्रंमाकामधून किंवा नदीमधून आणली होती हे मला सांगता येणार नाही. मी नदीमधून किंवा सर्वे क्रमांकामधून रेती काढत असतांना आरोपी क्र.२ ला पाहीलेले नव्हते. दोन गावांना जोडणारे रस्ते वनपरिक्षेत्रामधून जातात. आरोपी क्र.२ चे ट्रॅक्टर सुध्दा रस्त्याने जात होते. ट्रॉली मध्ये रेती भरण्यासाठी यंत्राची किंवा माणसांची आवश्यकता असते. मला घटनास्थळावर यंत्र किंवा माणसे आढळली नव्हती. ट्रॉलीमध्ये रेती भरण्याची कुठलिही साधने नव्हती. ट्रॅक्टर पाहिले त्यावेळी मला त्याच्या चालक किंवा मालकाची नावे माहित नव्हते. घटना गुळभेली गावाच्या परिसरात घडली. वनपरिक्षेत्रामध्ये गावाचा भाग येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, गौनखनिज पकड–ण्याचे काम वन खात्याचे नसून महसूल खात्याचे आहे. मोटरसायकल किंवा ट्रॅक्टर हे आरोपीच्या मालकीचे व ताब्यातील होते किंवा नाही याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, ट्रॅक्टर जप्त करतेवेळी त्यात रेती किंवा कुठलेही सामान नव्हते. ट्रॅक्टर चालकाचे व माझे पहिलयांदा बोलणे गुळभेली गावाजवळ झाले. त्यावेळी मला आरोपीने गौनखनिज वनपरिक्षेत्रातून आणले अशी शंका होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर शंकेच निरसण मी किंवा पोलिसांनी शेवटपर्यंत केले नाही. मी पोलिसांना रेती आणल्याचे ठिकाण शेवटपर्यंत दाखविले नाही. सदर रेती कुठून आणली याबाबत मला पोलिसांनी चौकशी केली नाही.

०५. हे म्हणणे खरे नाही की, बुडन खान हा वनविभागाचा कायमस्वरूपी कर्मचारी नाही. हे म्हणणे खरे नाही की, १४/१०/२०१७ रोजी तो माझ्या सोबत नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, तो वनमजूरदेखील त्यादिवशी कामाला नव्हता.

०६. हे म्हणणे खरे नाही की, दत्त मंदिराजवळील घटनेच्या वेळी मी गाडी

चालवत होतो. त्यावेळी माझी गाडी ट्रॅक्टरच्या समोर होती. घटनेच्यावेळी मी मोटरसायकल वरून खाली उतरलो होतो.

०७. हे म्हणणे खरे नाही की, रेती चोरीची कुठलीही घटना माझ्या समक्ष घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या अंगावर कुठलिही गाडी आणण्यात आली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला कुठलिही मारहाण करण्यात आली नाही. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १४/१०/२०१७ रोजी माझी वनपरिक्षेत्रामध्ये कुठलिही ड्युटी नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला कुठलाही मार लागलेला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीविरूध्द खोटी फिर्याद दाखल केली.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by RAJENDRAKUMAR BABASAHEB GIRI
Date: 2025.11.25 10:20:43 +0530

मलकापूर.

दिनांक - २४/११/२०२५

**(आर. बी. गिरी)**

अतिरिक्त सत्र न्यायाधीश मलकापूर

**CERTIFICATE**

I certify that this order P.D.F. uploaded is a true and correct copy of original signed order.

| | | |
|---|---|---|
| Name of Court | : | Adhoc District Judge – 1 & Additional Sessions Judge, Malkapur. |
| Name of Stenographer | : | Shri. V. S. Jadhav. (Junior Clerk) |
| Date of order | : | 24.11.2025 |
| Date of signed on order by Judicial Officer | : | 24.11.2025 |
| Date of uploading | : | 25.11.2025 |